# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- द्रद्धःद्.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ३१-२३** **दिनांक २७/०१/२०२३**

## पोलीस असल्याची बतावणी करुन खंडणी मागणाऱ्या दोन आरोपीतांना अटक- नवघर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

नवघर पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. I ५९/२०२३ भा.द.वि कलम १७०, ४१९, ४२०, ३८४, ३८५, १२०(ब), ३४ प्रमाणे दि.२७/०१/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. नमुद गुन्ह्यातील फिर्यादी नामे कु. भाविका रमेश पुरोहीत वय- २३ वर्ष, व्यवाय- नोकरी, रा. भाईंदर-पुर्व यांनी पोलीस ठाणेस तक्रार दिली की, दि.२६/०१/२०२३ रोजी फिर्यादी, त्यांची आई तसेच फिर्यादी यांची मैत्रीण व फिर्यादी यांचा आईची मैत्रीण व त्यांचासोबत आलेला इसम असे त्यांचा घरी उपस्थितीत असताना सुमारे १६.३० वा. चे सुमारास त्यांच्या घरी दोन अनोळखी इसम वय अंदाजे ४०-४५ वर्षे वयोगटातील असावे हे आले व त्यांना म्हणाले की, हम पुलिस स्टेशन से आए है आप घर मे वेश्या व्यवसाय चला रहे हो ऐसी इनफरमेशन हमको मिली हे और हम आपके एफ आय आर दाखल करके उसके बारे मे मिडाया और आपकी सोसायटी मे बताने वाले है असे म्हणुन त्यांनी फिर्यादी यांचाकडुन पाच लाख रुपयांची खंडणी मागीतली व तडजोडी अंती त्यांचाकडुन रुपये-४०,०००/- घेतले होते. सदरबाबत प्रसंगावधान साधुन फिर्यादी यांनी त्वरीत सदर घटनेची नवघर पोलीस ठाणे येथे माहिती दिली व त्यानुसार नवघर पोलीस ठाण्याचे पथक त्वरीत घटनास्थळावर रवाना होवुन सदर दोन इसम यांना ताब्यात घेतले.

नमुद इसम यांना ताब्यात घेतल्यानंतर त्यांना पोलीस ठाणेस आणुन त्यांचाकडे तपास केला असता त्यांनी त्यांची नावे १) सुदर्शन बिबीशन खंदारे वय- ३२ वर्ष रा. नवघर रोड, भाईंदर-पुर्व, २) जितेद्र नारायण पटेल वय- ५५ वर्ष रा. टीवरी रोड, नायगाव- पुर्व असल्याचे सांगितले. सदर आरोपी यांना नमुद गुन्हयात दिनांक २७/०१/२०२३ रेजी अटक करण्यात आली असुन त्यांचाकडुन त्यांनी फिर्यादीकडुन घेतलेले ४०,०००/- रुपये रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. नमुर आरोपीत यांच्याबाबत अधिक तपास केला असता ते नवघर पोलीस ठाण्याचे अभिलेखावरील गुन्हेगार असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, श्री. शशिकांत भोसले, सहायक पोलीस आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. मिलिंद देसाई, पो.नी. श्री. सुशीलकुमार शिंदे (गुन्हे), स.पो.नि. योगेश काळे, पो.उप.निरी तुषार माळोदे, अभिजीत लांडे, पो.हवा. भुषण पाटील, नवथाथ घुगे, सुरेश चव्हाण, पो. अंम. सुरज घुनावत, पो. अंम. ओंमकार यादव, केशव भोये, अमित तडवी यांनी केलेली आहे.

-----ooo-----